सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# नशामुक्ती जनजागृती अभियान उच्चस्तरीय समिती

(शा. नि. गृहविभाग ०५२६ / प्र.क्र.१५७ / वि शा -३(अ) दिनांक २१ मे २०२६ द्वारे स्थापित)

**मार्गदर्शक माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र**

## Drug Free MUMBAI

अध्यक्ष

**श्री मंगल प्रभात लोढा**
कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य

सदस्य

**श्री देवेन भारती**
पोलीस आयुक्त, मुंबई

**श्रीमती अश्विनी भिडे**
आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका

**श्रीमती आंचल गोयल**
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

**श्री सौरभ कटियार**
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
(सदस्य सचिव)

क्र. ________

दि. २७/७/ २०२६

**प्रति,**
**प्रा. महेंद्र चौहान**
**अध्यक्ष,**
**आईएमसी चेंबर ऑफ कॉमर्स,**
**मुंबई.**

**विषय : "नशामुक्ती जनजागृती अभियान – मुंबई २०२६" अंतर्गत आयोजित सामूहिक शपथ कार्यक्रमात उद्योग व व्यापार क्षेत्राच्या व्यापक ऑनलाइन सहभागाबाबत.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली गठित **नशामुक्ती जनजागृती उच्चस्तरीय समितीच्या** माध्यमातून मुंबई शहरात **"नशामुक्ती जनजागृती अभियान – मुंबई २०२६ व सामूहिक शपथ कार्यक्रम"** राबविण्यात येत आहे. युवक, कर्मचारी, कामगार आणि समाजातील सर्व घटकांमध्ये अमली पदार्थ व विविध व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक दृष्टिकोन विकसित करणे तसेच नशामुक्त समाजनिर्मितीसाठी व्यापक लोकसहभाग वाढविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

या अभियानांतर्गत **गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता, एनएससीआय डोम, वरळी, मुंबई** येथे भव्य सामूहिक शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास राज्यातील मान्यवर पदाधिकारी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संस्था, औद्योगिक आस्थापना, व्यापार संघटना तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे ऑनलाइन प्रक्षेपणही करण्यात येणार असून मोठ्या संख्येने नागरिक, कर्मचारी व युवक ऑनलाइन माध्यमातून सामूहिक नशामुक्तीची शपथ घेणार आहेत.

तरी आपल्या संघटनेशी संलग्न उद्योगसमूह, व्यापारी संस्था, कॉर्पोरेट कार्यालये, औद्योगिक आस्थापना, उद्योजक, अधिकारी व कर्मचारी यांना सदर कार्यक्रमात **ऑनलाइन माध्यमातून मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.** कार्यक्रमाची माहिती, ऑनलाइन सहभागाची लिंक व QR Code हे आपल्या सदस्य संस्थांना ई-मेल, संकेतस्थळ, सोशल मीडिया माध्यमे, व्हॉट्सॲप गट आणि अंतर्गत संवाद यंत्रणांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसारित करावेत. तसेच शक्य असल्यास संबंधित कार्यालयांमध्ये कार्यक्रमाचे सामूहिक प्रक्षेपण करून अधिकारी व कर्मचाऱ्यांचा एकत्रित सहभाग सुनिश्चित करावा.

**"नशामुक्त युवा – सुरक्षित मुंबई – सशक्त महाराष्ट्र"** हा संदेश उद्योग व व्यापार क्षेत्रातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या संघटनेचे सक्रिय सहकार्य अपेक्षित आहे. नशामुक्त, सुरक्षित आणि जबाबदार कार्यसंस्कृती निर्माण करण्याच्या या सामाजिक उपक्रमात आपल्या संस्थेचा व्यापक सहभाग अभियानाला अधिक बळ देईल.

**ऑनलाइन सहभागासाठी लिंक : https://webcast.gov.in/maharashtra/**

मंगल प्रभात लोढा

**(मंगल प्रभात लोढा )**